MHPU250015622019

**<u>फौ.कि.अर्ज नं. ३५८/२०१९ मधील निशाणी क्र. २० वरील आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी मुळ अर्ज नि. १ वर दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यावर जाबदेणारतर्फे लेखी म्हणणे मागविण्यात आले.

२. अर्जदाराचे अर्जातील कथनानुसार अर्जाचे कामकाज चालू असतांना अर्जदार नं. २ रूद्र संजय गायकवाड वय ४ वर्ष हा दिनांक ०६/१०/२०२१ रोजी आजारपणामुळे मयत झाला असल्याने त्यांचे नांव व त्याचे संदर्भातील मागणी कलमातील मागणी कमी होवून त्याप्रमाणे मुळ अर्जात दुरूस्ती होवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर जाबदेणार यांनी म्हणणे देवून हरकत नोंदवली आहे. जाबदेणार यांचे म्हणण्यानुसार अर्जदार क्र. २ याचे मृत्युबाबत जाबदेणार यांना कोणतीही कल्पना नसल्याने त्यांना शारिरीक व मानसिक धक्का बसला असून अर्जदार नं २ याचे मृत्युचे निश्चित कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे अर्जदार नं २ यांचे मृत्युबाबत आवश्यक तो खुलासा नमुद केलेला नसल्याने अर्ज फेटाळावा अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत मुळ अर्ज हा अर्जदार हिने महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदयाचे कलम १२ अन्वये दाखल केलेला आहे. अर्जदार हिने प्रस्तुतचे दुरूस्ती अर्जासोबत नि २३ ची कागदयादीसोबत अर्जदार क्र. २ याचा मृत्युचा दाखल जोडलेला आहे. सदर दाखल्याचे अवलोकन करता अर्जदार क्र २ हा दिनांक ०६/१०/२०२१ रोजी डॉ. डुंबरे हॉस्पीटल जुन्नर येथे मयत झाल्याचे दिसून येते अशा परिस्थीतीत अर्जदार क्र. २ याचे नाव मुळ अर्जाच्या कामातून कमी करून त्याचे

संदर्भात अर्जदार क्र. १ हिने केलेली मागणी देखिल कमी करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असल्याचे दिसून येते. अर्जदार हिने दुरूस्ती अर्जात मागणी केलेली दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असल्याने ती मंजूर करणे गरजेचे असल्याचे निष्कर्षाप्रत येवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदार यांचा सदरचा अर्ज निशाणी क्र. २० मंजुर करण्यात येत असून त्यांनी सदर अर्जाप्रमाणे योग्य ती दुरुस्ती त्वरीत करावी.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

दि.२९/०६/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जुन्नर.